आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ फेब्रुवारी २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांचं मुंबईत आगमन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मॅक्राँ यांच्यात द्विपक्षीय चर्चा होणार

- कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात पुढच्या दोन वर्षांत २०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक अपेक्षित असल्याचं अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन

- एआय इम्पॅक्ट समिट मधे आज आरोग्य मंत्रालयाच्या ‘सही’ आणि ‘बोध’ या राष्ट्रीय उपक्रमांचा प्रारंभ होणार

- बंगळुरू इथं आज भारत-फ्रान्स संरक्षण बैठक

**आणि**

- ग्रेट निकोबर बेटावरच्या प्रस्तावित बंदर आणि आणि गोदी प्रकल्पाला राष्ट्रीय हरित न्यायधिकरणाची पर्यावरणविषयक परवानगी

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांची आज मुंबईत लोकभवन इथं भेट होत आहे. या भेटीमुळे दोन्ही देशांमधले संबंध दृढ होणार असून जागतिक विकासाच्या दृष्टीने हे महत्त्वाचं ठऱणार आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. मॅक्राँ यांचं स्वागत करताना आपल्याला आनंद होत असून दोन्ही देशाच्या धोरणात्मक भागीदारीला गती देण्यास भारत उत्सुक असल्याचं मोदी म्हणाले. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ आजपासून ३ दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून ते पहिल्यांदाच मुंबईला येत आहेत. उभय देशातल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा ते यावेळी घेतील. त्यानंतर ते भारत फ्रान्स नवोन्मेष वर्ष २०२६ या कार्यक्रमाचं उद्घाटन संयुक्तपणे करतील. दोन्ही देशातले मोठे व्यावसायिक, उद्योगपती, संशोधक, आणि नवोन्मेषकर्मी या कार्यक्रमात भाग घेणार आहेत.

दरम्यान, इम्यॅन्युअल मॅक्राँ आणि त्यांच्या पत्नी ब्रिगिट यांचं आज मुंबईत आगमन झालं. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचं

स्वागत केलं. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

प्रधानमंत्री मोदी आणि राष्ट्राध्यक्ष मॅक्राँ आज संध्याकाळी गेट वे ऑफ इंडिया इथं होणाऱ्या सांस्कृतिक सोहळ्यात उपस्थित  राहणार आहेत.

<><><><><>

एआय इम्पॅक्ट एक्स्पो २०२६ हे नवीन कल्पना, नवोन्मोष आणि उद्देश यांचा शक्तीशाली संगम आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्राचा विकास करण्यासाठी भारत सक्षम असल्याचं या प्रदर्शनातून दिसून येतं असं प्रधानमंत्री म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी काल कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभाव प्रदर्शनाचं उद्घाटन केलं.

नवी दिल्लीत सुरू असलेल्या एआय इम्पॅक्ट समिटचा आज दुसरा दिवस आहे. सर्वसमावेशक आणि प्रगतीशील वाढीसाठी एआयचा वापर या विषयावर आज दिवसभरात विविध चर्चासत्रं होणार आहेत.

एआय इम्पॅक्ट समिट २०२६चं औपचारिक उद्घाटन काल नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. या परिषदेत सहभागी होण्यासाठी  शंभर पेक्षा जास्त देशांना आमंत्रित करण्यात आलं आहे. २० पेक्षा जास्त देशांचे नेते आणि ४५ पेक्षा जास्त  देशांची मंत्रिस्तरीय शिष्टमंडळं परिषदेत सहभागी होणार आहेत. दोन लाखांपेक्षा जास्त लोकांनी यासाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे.

या परिषदेत पाच नाविन्यपूर्ण स्टार्टअपसह भारतातल्या वेगाने वाढणाऱ्या एआय आणि गेमिंग परिसंस्थेशी संबंधित चर्चा आणि प्रदर्शनांचा समावेश आहे.

<><><><><>

एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात पुढच्या दोन वर्षांत २०० अब्ज वडॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक अपेक्षित असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. नवी दिल्लीत भारत मंडपम इथे आयोजित एआय समिट दरम्यान घेतलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. सामान्य जीवनात कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा वापर वाढवणं, या क्षेत्रातल्या नवीन संशोधनाला प्रोत्साहन देतानाच, त्याचे तोटे कमीत कमी करणं, याला आपलं प्राधान्य असेल, असंही वैष्णव यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

इंडिया एआय समिटमध्ये, आज आरोग्य क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासंदर्भात, सही आणि बोध या दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय उपक्रमांचा प्रारंभ होणार आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे पी नड्डा यांच्या हस्ते याची सुरुवात होईल. स्ट्रॅटेजी फॉर आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन हेल्थकेअर फॉर इंडिया म्हणजे ‘सही’ आणि बेंचमार्किंग ओपन डेटा प्लॅटफॉर्म फॉर हेल्थ एआय म्हणजेच ‘बोध’ असे हे दोन उपक्रम आहेत. भारताच्या आरोग्य सेवा प्रणालीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा सुरक्षित, नैतिक, प्रमाणाधारित आणि सर्वसमावेशक वापर करण्यासाठीची मार्गदर्शक चौकट म्हणून ‘सही’ उपक्रम काम करणार आहे. तर ‘बोध’ ही गोपनियतेचं संरक्षण करणारं व्यासपीठ आहे. जागतिक स्तरावर एक जबाबदार आणि स्पर्धात्मक आरोग्य एआय परिसंस्था तयार करण्याच्या दिशेने, देशानं टाकलेलं हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी ‘भारत विस्तार’ ही नवीन डिजिटल सुविधा सुरु केली आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान आणि राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी आज जयपूर इथं त्याचं उद्घाटन केलं. कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक धोरण आणि आराखडा, तसंच अग्रीकोष या हॅकेथॉनचं देखील उद्घाटन त्यांनी केलं. भारत विस्तारवर देशभरातल्या शेतकऱ्यांना शेती आणि शेतमालविक्री विषयक सर्व प्रकारचं मार्गदर्शन उपलब्ध राहील.

**<><><><><>**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि फ्रान्सच्या संरक्षण मंत्री कॅथरीन वाऊटरिन यांच्या अध्यक्षतेखाली आज भारत फ्रान्स संरक्षण बैठक होत आहे. बंगळुरु इथं होणाऱ्या या बैठकीत संरक्षण सहकार्यांच्या सर्व बाजूंचा आढावा घेतला जाईल. संरक्षण क्षेत्रातील औद्योगिक भागीदारी यावर प्रामुख्याने चर्चा होईल. तसंच या बैठकीत, संरक्षण सहकार्य कराराचे पुढील १० वर्षांसाठी नूतनीकरण होण्याची अपेक्षा आहे. या बैठकीत संयुक्त उद्योगाकडून हॅमर क्षेपणास्त्रांची निर्मितीसंदर्भात सामंजस्य करार होईल असा अंदाज आहे.

**<><><><><>**

हवामान बदलाचं आव्हान दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर बनत असून त्यावर तातडीनं कृती गरजेची असल्याचं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबईत आयोजित मुंबई क्लायमेट वीकचं उद्घाटन करताना आज ते बोलत होते. पर्यायी इंधनाचा वापर आणि पर्यावरण पूरक सोयी सुविधा यावर भविष्यात भर राहणार असून हवामान बदलाला तोंड देण्याच्या दृष्टीनं आंतरराष्ट्रीय भागीदारी आणि आर्थिक पाठबळाची गरज असल्याचं ते म्हणाले. शेती, मत्स्यव्यवसाय आणि एकूणच ग्रामीण अर्थव्यवस्थेवर याचा दुष्परिणाम जाणवू लागला आहे असं ते म्हणाले.

<><><><><>

गुजरातमध्ये गांधीनगर इथे केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार मंत्र्यांच्या उच्चस्तरीय मंथन परिषदेचं आयोजन करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'सहकारातून समृद्धी' या धोरणाला साकार करण्याच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल म्हणून या परिषदेचं आयोजन करण्यात येत आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात बारामतीजवळ महिन्यापूर्वी कोसळलेल्या लिअरजेट 45 विमानाच्या कॉकपीट वाईस रेकॉर्डरमधला डेटा मिळवण्यासाठी व्हाईस रेकॉर्डरच्या निर्मात्या कंपनीकडून विशेष सहाय्य मागवलं असल्याचं विमान अपघात तपास कार्यालय अर्थात A A I B ने म्हटलं आहे. या विमानात दोन स्वतंत्र रेकॉर्डर होते. दुर्घटनेपूर्वी हे दोन्ही रेकॉर्डर बराच काळ तीव्र तापमानात राहिल्याचं A A I B ने म्हटलं आहे. महिन्याभरापूर्वी झालेल्या या विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीचा तसंच मतदार यादी पुनरीक्षणाचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोगाचे नवनियुक्त निरीक्षक एन. के. मिश्रा आज संध्याकाळपासून राज्याच्या दौऱ्यावर आहेत.

<><><><><>

ग्रेट निकोबर बेटावरच्या प्रस्तावित बंदर गोदी प्रकल्पाला राष्ट्रीय हरित न्यायधिकरणाने पर्यावरणविषयक परवानगी दिली आहे. न्यायधिकरणाच्या कोलकाता पीठाचे

अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव यांनी काल याबाबतचा आदेश जारी केला. या प्रकल्पामुळे किनारी क्षेत्र आणि इतर मर्यादांचं उल्लंघन होत असल्याचा आरोप करणाऱ्या अनेक याचिकांवर हा आदेश दिला आहे.  प्रकल्पात पर्यावरणाच्या दृष्टीनं पुरेशी काळजी घेण्याची तरतूद आहे, मात्र त्याची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे असं न्यायधिकरणाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात बीएनपी अर्थात बांग्लादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या नवनिर्वाचित सदस्यांनी आज पदाची शपथ घेतली. बांगलादेश संसदेचं अध्यक्षपद तसंच उपाध्यक्षपद रिक्त असल्यानं मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांना शपथ दिली.

**<><><><><>**

टी ट्वेंटी विश्व चषक क्रिकेट स्पर्धेत आज ग्रुप डी मधे न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात कॅनडाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कॅनडाने २० षटकांत ४ बाद १७३ धावा करुन न्यूझीलंडसमोर विजयासाठी १७४ धावांचं आव्हान ठेवलं आहे. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडीयमवर सामना सुरु आहे.

ग्रुप बी मधे आजचा सामना श्रीलंकेत पल्लिकल इथं आयर्लंड आणि  झिंबाब्वेमधे होणार आहे. सामना दुपारी ३ वाजता सुरु होईल.

मुंबईच्या वानखेडे स्टेडीयमवर सी ग्रुप मधे स्कॉटलंड विरुद्ध नेपाळ हा सामना संध्याकाळी ७ वाजता होणार आहे.

**//<><><><><>//**